MHYA210002182025

**निशाणी क्रमांक १–अ वरील आदेश**

(पारित दि.१२/०३/२०२६)

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५ अंतर्गत अंतरिम खावटी मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन केले आहे की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी असून त्यांचा विवाह दि.२३/०२/२०२३ रोजी श्री. संत गजानन महाराज श्रद्धाश्रम मौजा घोन्सा ता. वणी, जि. यवतमाळ येथे समाजाचे जाती रीतीरिवाजा प्रमाणे संपन्न झाला. गैरअर्जदार क्र.१ चे व अर्जदार यांचे विवाहाचे एक वर्ष पुर्वीपासून प्रेमसंबंध होते व त्याप्रेमसंबंधातून गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार बरोबर विवाह केला. गैरअर्जदार क्र.२ ते ५ यांना अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ चा विवाह मंजूर नव्हता. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांचे संयुक्त कुटूंबात मौजा घोन्सा येथे नांदावयास गेली. गैरअर्जदार क्र.१ ला दारूचे व्यसन होते. लग्नानंतर गैरअर्जदार क्र.२ ते ५ व त्यांचे परीवारातील सदस्यांनी अर्जदाराचा कधीही स्विकार केला नाही. ते नेहमी तिच्याशी का लग्न केले असे म्हणून गैरअर्जदार क्र.१ ला अर्जदाराविरूद्ध भडकवित होते. त्यामूळे गैरअर्जदार नं १ हा अर्जदार हिला दारूच्या नशेत शिवीगाळ करून मारहान करीत होता. गैरअर्जदार क्र.२ ते ५ हे अर्जदार हिला नेहमी घालून पाडून बोलत व तिला नेहमी शिवीगाळ करीत होते. तसेच तिला नेहमी घरातून हाकलून देण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु, अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ चे प्रेमापोठी सर्व सहन करीत होती. परंतु, गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिला गैरअर्जदार क्र.२ ते ५ च्या भडकावल्यावरून शिवीगाळ करून मारहान करीत होता.

०३. एप्रिल २०२३ मध्ये गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिला घेवून नागपूर येथे भाडयाची खोली करून राहू लागला. परंतु, तिथेही गैरअर्जदार क्र.२ व ३ हे

गैरअर्जदार क्र.१ ला फोन करून अर्जदाराविरूद्ध भडकवित. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हो दारू पिवून अर्जदार हिला मारहान करीत होता. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ हा नागपूर येथे राहत असतांना तो अर्जदार हिला कोणाशीही बोलू देत नव्हता व तिच्यावर नेहमी संशयीत नजरेने पाहत होता. तसेच तो अर्जदार शेजारीपाजारी कोणाशी बोलतांना दिसली की, तिला बेदम मारहान करीत होते.

०४. माहे जुलै २०२३ मध्ये गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिला उत्तरप्रदेश येथील मथुरा गावाजवळ त्याचे आईचे गावी घेवून गेला. परंतु, गैरअर्जदार क्र.१ चे आईने, तु हिला इथे का घेवून आला म्हणून गैरअर्जदार क्र.१ ला म्हटले व तेव्हा गैरअर्जदार क्र.१ व त्यांचे आईने अर्जदाराला शिवीगाळ करून चमडयाच्या पट्ट्याने मारहान केली व गैरअर्जदार क्र.१ चे आईकडून परत आल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार हीला त्याचे घरातून हाकलून दिले व परत आली तर तुला जिवाने मारून टाकीन, अशी धमकी दिली. त्यामूळे, अर्जदार ही दि.०१/०८/२०२३ रोजी तिचे माहेरी परत गेली व तिने गैरअर्जदार व त्यांचे परिवारातील सर्व सदस्यांनी दिलेला त्रास तिचे आई वडीलांना सांगीतला.

०५. दि.०२/०९/२०२३ रोजी गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराचे आई–वडीलांचे घरी दारूचे नशेत आला. तेव्हा अर्जदार व तिची आई घरी असतांना त्याने अर्जदार हिला शिवीगाळ करून तिच्याशी भांडण केले व तो तिला मारायला जात होता. त्यामूळे, अर्जदाराचे आईने गैरअर्जदार क्र.१ ला वडील हजर असतांना या व बोला उगाचा वाद करून नका असे म्हटले. त्यावेळी, गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराचे आईला शिवीगाळ करुन लाथाबुक्याने मारहान केली व तिचे डाव्या हातावर जोरात बुक्की मारली. त्यामुळे, अर्जदाराचे आईचे डाव्या हाताला जबर मार लागून ती गंभीर जखमी झाली. अर्जदार आडवी आली असता, गैरअर्जदार क्र.१ ने तिला धक्काबुक्की

केली व दोघींना जिवाने मारून टाकतो, अशी धमकी दिली. अर्जदार व तिची आईने सदर घटनेचा रिपोर्ट पोलीस ठाणे, मुकूटबन येथे दि.०३/०९/२०२३ रोजी दिला. त्यानुसार गैरअर्जदार क्र.१ चे विरूद्ध नि. फौ. मा. क्र. ०२/२०२४ सुरू आहे. त्यानंतर, गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराचे वडील व नातेवाईकांना फोन करून जिवे मारण्याची धमकी देत आहे.

०६. गैरअर्जदार क्र.१ हा ट्रक ड्रायव्हर असून त्याला त्यापासून महीन्याला २५ ते ३० हजार रूपये पगार मिळतो. गैरअर्जदार क्र.१ वर अर्जदार हिचेव्यतीरिक्त कोणीही अवलंबून नाही. याउलट अर्जदार ही अल्पशिक्षीत असून तिला कोणतेही उत्पन्न नाही. अर्जदार तिचे आई वडीलांचे आश्रयाने हलाकीचे जिवन जगत आहे. त्यामुळे, अर्जदाराचे जिवीतास धोका आहे. अर्जदाराने तिचे वकीलामार्फत गैरअर्जदार क्र.१ यांना दि.३१/१२/२०२४ रोजी नोटीस पाठवून एकमुस्त खावटी देवून तिला न्यायालयीन सोडचिठ्ठी दयावी व तोपर्यंत तिचे पालणपोषण, कपडेलत्ता व औषोधीपचाराकरीता दरमाह रु.१५,०००/– पोटगी द्यावी, अशी मागणी केली. परंतु, त्याने अर्जदाराचे मागणीची पुर्तता केली नाही. उलट, गैरअर्जदार क्र.१ ने त्याचे वकीलामार्फत दि.१०/०१/२०२५ रोजी खोटी नोटीस पाठविली. शेवटी, अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ कडून औषधोपचार व निवासाकरीता रु.१५,०००/– अंतरीम पोटगी व त्याने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कोणताही शारीरिक व मानसीक त्रास देवू नये अथवा तिच्या माहेरी जावून कोणताही धिंगाणा करू नये, असा तात्पूरता आदेश मिळण्याची प्रार्थना केली. शेवटी, तिने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.
त असते तसेच भविष्यात त्यांचेकडे असलेल्या मालमत्तेची ते गैरकायदेशिरपणे विल्हेवाट लावू शकते.

०७. गैरअर्जदार क्र.१ ने सदर अर्जास जबाब दाखल केला नाही. त्यामुळे, सदर अर्ज त्याचे जबाबाविना चालविण्यात आला.

०८. अर्जदार व गैरअर्जदार यांचे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी अर्ज व जबाबातील कथनाप्रमाणे त्यांचा युक्तिवाद सादर केला. अभिलेखावर अर्जदाराचे उत्पन्न व दायित्वाचे शपथपत्र नि.क्र.०६ वर दाखल आहे. त्यामधील कथने ही अर्जातील कथनांशी सुसंगत आहे. अभिलेखावर दाखल असलेल्या नि.क्र.०९ वरील कौटुंबिक हिंसाचार अहवाल व पोलीस ठाणे, मुकुटबण येथे दाखल असलेल्या छापील खबर अहवालाचे अवलोकन केले असता अर्जदार ही गैरअर्जदारांचे कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे, प्रस्तुतचा अर्ज हा शपथपत्रावर दाखल करण्यात आला आहे. तसेच, अर्जदार आज रोजी तिचे माहेरी राहत आहेत. मला येथे नमूद करावेसे वाटते की, सदरचा अर्ज निकाली काढतांना पुराव्याची आवश्यकता नसते. त्यामुळे, सदर अर्ज निकाली काढतेवेळी मुख्य अर्जाचे गुणदोष तपासणे योग्य होणार नाही.

०९. वरील विवेंचनेवरुन अर्जदार गैरअर्जदारांचे कौटुंबिक हिंसाचाराची बळी ठरल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे, ती अंतरिम खावटी आदेश मिळण्यास पात्र ठरते. अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ हा ट्रक चालक असून त्यापासुन त्यास दरमहा रु.२५ ते ३० हजार उत्पन्न मिळते, असे कथन केले आहे. परंतु, अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ चे उत्पन्नाबाबत किंवा तो ट्रक चालक असल्याबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केले नाही. परंतु, असे असले तरी गैरअर्जदार क्र.१ हा २४ वर्षीय तरुण आहे. तसेच, त्यांनी यापूर्वी अर्जदाराचे पालनपोषण केले आहे. अशा परिस्थितीमध्ये, गैरअर्जदार क्र.१ ला निश्चित असे उत्पन्न मिळत असल्याचे दिसून येते. त्यामुळे, गैरअर्जदारांना कोणतेही उत्पन्न मिळत नाही, यावर विश्वास ठेवता येत नाही. त्याचप्रमाणे, अर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी असल्यामुळे तिचे पालणपोषण करणे, ही त्याची कायदेशीर व नैतीक जबाबदारी आहे. सर्वसाधारण आर्थिक सहाय्यतेचे प्रकरणात अर्जदार गैरअर्जदारांचे उत्पन्न वाढवुन सांगण्याचे

प्रयत्नात असतात. याउलट, गैरअर्जदार त्यांचे उत्पन्न कमी दाखवण्याचा प्रयत्नात असतात. असे असले तरी अर्जदार व गैरअर्जदार यांचे राहणीमानाचा दर्जा, महागाई व गैरअर्जदाराचे उत्पन्न, त्याचेवरील जबाबदारी, या सर्व बाबीचा विचार करता अर्जदारांना एकत्रीतरित्या रु.२,०००/- अंतरिम खावटी देणे न्यायोचित ठरेल. सबब, मी वरील विवेंचनेवरून खालील आदेश पारित करतो,

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराला अर्ज दाखल तारखेपासून मूळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत दरमहा रु.२,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार फक्त) अंतरिम पोटगी द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना मोफत देण्यात येते यावी.

Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSLE

दि.१२/०३/२०२६

**(शहाजी द. भोसले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, वणी.